<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

पुणे महानगरपालिका
सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक ६४ )
शुक्रवार, दिनांक २३/९/२०२२, दुपारी ४.०५ वाजता

पुणे महानगरपालिकेची विशेष (खास-स्थगित) सभा (माहे सप्टेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक २०/९/२०२२ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयात भरली होती.

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. विक्रम कुमार, भा.प्र.से. | - | प्रशासक तथा महापालिका आयुक्त |
| २) | मा. डॉ.कुणाल खेमनार,भा.प्र.से. | - | अति.महा.आयुक्त (इ) |
| ३) | मा. रविंद्र बिनवडे, भा.प्र.से. | - | अति.महा.आयुक्त (ज) |
| ४) | मा.विलास कानडे | - | अति.महा.आयुक्त (वि) |
| ५) | मा.सौ.उल्का कळसकर | - | सह महापालिका आयुक्त तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ६) | मा.प्रशांत वाघमारे | - | शहर अभियंता |
| ७) | मा.श्रीनिवास बोनाला | - | मुख्य अभियंता (प्रकल्प) |
| ८) | मा. शिवाजी दौंडकर | - | सह महा.आयुक्त तथा नगरसचिव |

तसेच अन्य खातेप्रमुख व विभाग प्रमुख उपस्थित होते.

मा. विक्रम कुमार, भा.प्र.से., प्रशासक तथा महापालिका आयुक्त हे अध्यक्षस्थानी होते.

**मा. प्रशासक :** सभा सुरु करावी.

**नगरसचिव :** माहे सप्टेंबर २०२२ खास कार्यपत्रिका. सन २०२२-२०२३ या वर्षासाठीचे मा.स्थायी समितीने मंजूर केलेले **''अ'' व ''क''** अंदाजपत्रक सभेपुढे मांडण्यात आले आहे.

विषय क्र. १६५

विषय :- सन २०२२ - २०२३ साठी स्थायी समितीने तयार केलेला वार्षिक जमा खर्चाचा अर्थसंकल्प ''अ'' व ''क'' मान्यतेसाठी.

**मा. प्रशासक :** सन २०२२-२३ साठी प्रशासनाने सादर केलेले वार्षिक जमा-खर्चाचा अर्थसंकल्प ''अ'' व ''क'' मंजूर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक :- २१६

विषय :- सन २०२२ - २०२३ साठी स्थायी समितीने तयार केलेला वार्षिक जमा खर्चाचा अर्थसंकल्प '' अ '' व '' क ''

---

सन २०२२ - २०२३ साठी प्रशासनाने सादर केलेला पुणे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प ''अ'' व ''क'' मध्ये दर्शविल्याप्रमाणे बाबवार मान्य करण्यात येत आहे.

निर्णय : विषय क्र. १६५ संमत झाल्याचे प्रशासक यांनी प्रकट केले.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपल्याचे मा.प्रशासक यांनी जाहिर केले.

स्वाक्षरी/-XXX
शिवाजी दौंडकर,
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

*******

दिनांक १/११/२०२२ च्या सभेत वृत्तांत कायम केला.

स्वाक्षरी/-XXX
प्रशासक, पुणे म.न.पा.

*******